# जेव्हा जाग्या झालेल्या माणसाला झोडपले जाते–

भारत स्वतंत्र होण्याच्या थोडेसे अगोदर गोदावरी परुळेकरांच्या नेतृत्वाखाली वारली समाजाने जुलमी सावकार, व्यापारी आणि सरकारी अधिकारी यांच्याविरुद्ध एक जोरदार लढा दिला. या लढ्यात अनेक बांधील गडी वेठबिगारीतून मुक्त झाले. सावकारांची, जंगल कंत्राटदारांची अमानुष मारहाण कमी झाली. पोलिस, तलाठी आणि फॉरेस्ट गार्ड यांची अरेरावी कमी झाली. दडपला गेलेला वारली जागा झाला. लाल बावट्याचे नाव पाड्या-पाड्यावर गेले. या सर्व लढ्याचे रोमहर्षक वर्णन 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकात गोदावरीबाईंनी केले आहे.

आज त्याच डहाणू–तलासरी भागात गोदावरीबाईंचे अनुयायी म्हणवणारे किसान सभेचे कार्यकर्ते, 'कष्टकरी संघटने'च्या कार्यकर्त्यांवर हल्ले करत आहेत, कष्टकरी संघटनेचा प्रभाव असणाऱ्या पाड्यांवर धाडी घालत आहेत आणि पुन्हा एकदा या भागातले वातावरण ढवळून निघत आहे. या सर्व घटनांचा सखोल अभ्यास होणे जरूर आहे. त्यासंबंधी काही स्थूल विचार मांडण्याचा प्रयत्न या लेखात करण्यात आला आहे.

**शरद कुलकर्णी**

### लाल बावटा फिकट झाला

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डहाणू–तलासरी भागातला लाल बावट्याचा प्रभाव काहीसा स्थिर झाला. लढ्यानंतर वारली लोकांना सतत जागृत ठेवण्याचा प्रयत्न झाला नाही. कालांतराने लढ्यात भाग घेतलेले आदिवासी आणि बिगर आदिवासी कार्यकर्ते, कम्युनिस्ट पक्षाचे व किसान सभेचे काम बघू लागले. त्यापैकी कित्येकजण ग्रामपंचायतीचे सरपंच-सरपंच झाले. वारली समाजाचे प्रतिनिधी म्हणून त्यांना मान्यता मिळाली. हळूहळू सरकारी अधिकाऱ्यांनीही त्यांच्याशी संधान बांधले. लढ्याच्या काळात या कार्यकर्त्यांचे पुरेसे प्रशिक्षण झालेले नव्हते. लढा चालवणारे कार्यकर्ते भूमिगत किंवा तुरुंगात होते.

लढा संपल्यानंतर कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणावर भर देण्यात आला नाही. निवडणुकांत, डहाणू–तलासरीत कम्युनिस्ट पक्षाच्या तिकिटावरील लोक निवडून येतील एवढीच काळजी घेतली गेली.

हळूहळू सावकारांनी या कार्यकर्त्यांच्या हमीवर गरिबांना कर्ज देणे सुरू केले. काही कार्यकर्ते गवत कापणीवर देखरेखीचे काम करू लागले. कार्यकर्त्यांच्या ओळखीने सरकारी अधिकाऱ्यांकडून कामे करून घेणे सोपे होऊ लागले. या सर्व कामात कार्यकर्ते हात ओला करून घेऊ लागले. अन्यायी अधिकाऱ्यांना, जबर व्याज घेणाऱ्या सावकारांना, गरिबांना लुबाडणाऱ्या व्यापाऱ्यांना पाठीशी घालू लागले. कालांतराने अनेक कार्यकर्त्यांनी पक्षही बदलला. गोदावरीबाईंचा उजवा हात मानला गेलेल्या एका कार्यकर्त्याने काँग्रेस आय-मध्ये प्रवेश केला. त्याआधीच त्याच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे अनेक आरोप होते. त्याची खाजगी डेअरीही, कम्युनिस्ट पक्ष सोडण्याआधीही जोरात चालू होती. आणीबाणीच्या काळात गोदावरीबाईंचा डावा हात समजल्या गेलेल्या आणि लोकांवर जरब ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांनीही पोलिस आयचा आश्रय घेतला. गरीब वारल्यांची स्थिती खालावत गेली. एके काळी त्यांच्या मुक्तीसाठी लढणारे कार्यकर्ते शोषकांच्या गोटात जाऊन बसले. त्यांपैकी काही किसान सभेत राहून किसान सभेच्या सभांना लोकांना सक्तीने आणणे, मतदानास सक्तीने आणणे वगैरे कामे करीत. काही प्रसंगी गवत कापणीची मजुरी वाढावी म्हणून किसान सभा संप करत असे परंतु शोषणा विरुद्धचा लढा कमीकमी होत गेला.

कम्युनिस्ट पक्षाचा एक मतदार संघ एवढेच महत्त्व या भागाला राहिले.

### उत्तर हिंदुस्थानी व्यापाऱ्यांचे आगमन

१९६० नंतर या भागात अनेक उत्तर हिंदुस्थानी व्यापारी गवताच्या खरेदीसाठी येऊन राहिले. गवताच्या खरेदीबरोबरच काहींनी किराणा मालाची दुकाने थाटली. काहींनी छोटी हॉटेले सुरू केली. वारली लोकांकडून गवत खरेदी सुरू केली. या सर्व व्यापारात त्यांनी अतिशय लबाडी सुरू केली. गवत घेताना पैसे नंतर देऊ म्हणणे, आणि नंतर ते मुळीच न देणे, पैशाचा तगादा लावणा-या लोकांना मारहाण करणे, आदिवासी बायकांना त्रास देणे–हे प्रकार वाढत गेले. उत्तर हिंदुस्थानी व्यापाऱ्यांच्या दडपशाहीबरोबर सरकारी अधिकाऱ्यांची दडपशाही वाढत गेली आणि वारली समाज भरडला जाऊ लागला. या दडपशाहीला विरोध करण्याचे काम किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी केले नाही. कम्युनिस्ट पक्षाच्या एकंदर राजकारणात या विभागातील प्रश्नाकडे दुर्लक्ष झाले. लाल बावट्याच्या पूर्वीच्या लढ्यामुळे ही दडपशाही लढ्यापूर्वी इतकी तीव्र झाली नाही तरी तिच्यात क्रमाक्रमाने वाढ झाली हे मात्र नक्की.

### कष्टकरी संघटनेचा उदय

जानेवारी १९७९ मध्ये कष्टकरी संघटनेची रीतसर स्थापना झाली. ही संघटनेची स्थापना करण्यात प्रदीप प्रभू (पीटर डिमेलो) व निकी कार्डोझो या जेसुईट धर्मोपदेशकांनी पुढाकार घेतला. पीटर डिमेलो धर्मोपदेशकाची वस्त्रे चढवण्यापूर्वीच्या उमेदवारीच्या काळात

या भागात होते. त्या वेळी या भागातील शोषणाचे व अन्यायाचे स्वरूप त्यांनी पाहिले होते. त्याविरुद्ध आवाज उठवण्याचा प्रयत्न करताच, त्यांची तेथून बदली करण्यात आली. निकी कार्डोझोही या भागात शिक्षक होते. १९७७ च्या सुमारास हे दोघे डहाणूजवळील आशागड येथे एका चर्चमार्फत चालवलेल्या वसतिगृहाचे काम बघू लागले. त्या ठिकाणी त्यांनी शोषणाविरुद्ध तरुणांना संघटित करण्याचे काम सुरू केले. चर्चचा या कामाला विरोध झाला आणि अखेरीस धर्मोपदेशकाचे पद सोडून, चर्चबाहेर पडून, स्वतंत्रपणे गरिबांचे संघटन करण्याचा त्यांनी निश्चय केला. शिसणे गावातील पाटील पाड्यावरील काही लोकांनी त्या कामासाठी जागा दिली. या ठिकाणी सुशीला डिसोझा ही वसईची मुलगी त्यांना मदत करू लागली.

### कष्टकरी संघटनेचे कार्य

सुरवातीलाच कष्टकरी संघटनेने त्या भागातील दुकानदार-सावकार यांच्याकडे असलेले आदिवासींचे हिशेब मिटवण्याचे काम हातात घेतले. आंबोली येथील दुकानदाराच्या घरावर आदिवासींचा मोर्चा नेण्यात आला. त्यानंतर दुसऱ्या एका दुकानावर मोर्चा नेण्यात आला. या दोन्ही वेळा आदिवासींचे हिशेब पूर्ण करण्याचे आश्वासन दुकानदारांनी दिले. त्यामुळे आदिवासींना एक नवा हुरूप आला. अशा प्रकारच्या अधिकाधिक तक्रारी संघटनेकडे येऊ लागल्या. मार्च १९७९ मध्ये अशाच एका मोर्चाच्या वेळी आपल्या दुकानातील मालाची लूट केल्याचा आरोप दुकानदाराने कष्टकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांवर केला. पोलिसांनी या कार्यकर्त्यांवर भरलेली केस अद्यापही सुरू व्हावयाची आहे. या केसच्या निमित्ताने प्रदीप प्रभू व दोन आदिवासी कार्यकर्त्यांना ३० दिवस तरी तुरुंगात ठेवण्यात आले. आदिवासी महिलांना त्रास देणाऱ्या दुकानदारांना कित्येकदा या महिलांची जाहीर माफी मागावी लागली. या चळवळीतून चर्चदेखील सुटले नाही. उपलात येथील मिशनच्या शेतात शिरलेल्या गायींचा पाय मोडण्यात आला. त्याविरुद्ध नुकसानभरपाई आणि दंड आदिवासींनी मोर्चाने वसूल केला. डहाणू–तलासरी भागातील सावकारांनी व दुकानदारांनी बेकायदेशीररीत्या गिळंकृत केलेले आदिवासींचे पैसे बहुतेक प्रकरणांत त्यांना परत मिळाले. त्याचबरोबर या भागातील बेकायदेशीर सावकारी बऱ्याच प्रमाणात कमी झाली.

या भागातील मजुरांचेही, गवत व्यापाऱ्यांकडून, जंगल कंत्राटदारांकडून बरेच पैसे येणे होते. तेही मोर्चे काढून वसूल करण्याचा प्रयत्न केला गेला आणि त्यातही बरेच यश मिळाले. या भागात, पोलिस, तलाठी व जंगल खात्याचे लोक दमदाटी करून लोकांकडून पैसे उकळीत त्याविरुद्धही जनमत तयार करण्यात आले. आणि या गैरप्रकारांना बराच आळा बसला. मात्र या प्रकरणात, सर्व सरकारी नोकर संघटनेच्या विरुद्ध झाले. संघटना दहशतीचा अवलंब करीत आहे असे अहवाल त्यांनी आपल्या वरिष्ठांकडे पाठवून दिले.

### शत्रुत्वास सुरवात

महाराष्ट्र सरकारने गायराने, सरकारी पडीक जमिनी व जंगल जमिनी यांवरील अतिक्रमणे रीतसर करण्याचा एक आदेश डिसेंबर १९७८ मध्ये जाहीर केला. या आदेशात अनेक उणीवा होत्या. तो बदलून घेण्यासाठी अनेक आदिवासी संघटनांनी एकत्र येऊन मोठे आंदो[lan] सुरू केले. या सर्व आंदोलनांत कष्टकरी संघटनेने भाग घेतला. आदेश बदलण्याचे श्रेय आदिवासी संघटनांना न मिळता, आपल्या[ला] मिळावे म्हणून काही राजकीय कार्यकर्त्यांनी, महसूल मंत्र्यांना काही मागण्या पुढे मांडल्या व आदेश बदलून घेतला. या का[मी] गोदावरीबाईंनी पुढाकार घेतला हा नवीन आदेशही बराच स[दोष] (होता) राहिला. कारण या पुढाऱ्यांनी आपल्या मागण्या मांडता त्याचा पुरेसा अभ्यास केला नव्हता. त्याचप्रमाणे आदिवासी भागा[तील] प्रत्यक्ष परिस्थितीची त्यांना जाणीव नव्हती.

अनेक ठिकाणी आदिवासींची जमीन, बिगर आदिवासी बेकायदेशी[र] रीत्या कसत होते. कष्टकरी संघटनेने आदिवासींना त्या कसण्या[स] उद्युक्त केले आणि अनेक ठिकाणी बिगर-आदिवासी जमीन कसणाऱ्यां[चा] कडवा विरोध असूनही आदिवासींनी जमीन कसण्यास सुरवात के[ली]. या सर्व प्रकरणात कष्टकरी संघटनेच्या कामाला त्या भागात [...] प्रसिद्धी मिळाली. गावोगाव तरुण मंडळे सुरू झाली आणि संघटने[त] अनेक तरुण कार्यकर्ते आले. मात्र या कामात संघटनेला तीन [...] निर्माण झाले. किसान सभेने अनेक ठिकाणी संघटनेच्या मोर्चांना [...] म्हणून सावकार, व्यापाऱ्यांच्या बाजूने मोर्चे काढले. सावकार, दुका[न]दार आणि गावपातळीवरील सरकारी नोकर यांनी संघटनेविरुद्ध [...] प्रचार सुरू केला आणि त्यांच्याविरुद्ध खोटे खटलेही भरले. त्या[च] ख्रिश्चन धर्मोपदेशकही संघटनेच्या विरुद्ध गेले. कष्टकरी संघ[टनेचे] काम शांततेला बाधक आहे आणि ख्रिस्ताच्या प्रेमाच्या शिक[वणी]विरुद्ध आहे. असा प्रचार प्रार्थनांतूनदेखील केला गेला. त्यामुळे कष्ट[करी] संघटनेच्या पीटर डीमेलो व निकी कार्डोझो या कार्यकर्त्यांना धर्मोप[देशकांच्या] देशकांच्या पदावरून काढून टाकण्यात आले. पीटर डिमेलो [...] धर्मांतराच्या पूर्वी आपल्या कुटुंबाचे असलेले प्रभू हे आडनाव वापर[ण्यास] सुरवात केली. हा बदल ऐच्छिक होता. निकी कार्डोझो यांनी आपले नाव बदलले नाही.

### किसान सभेशी संघर्ष

कष्टकरी संघटनेने आपले काम सुरू केल्यानंतर पहिल्या दोन महिन्यांतच किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी संघटनेविरुद्ध काहूर माज[वले]. आपली या भागातील मक्तेदारी आणि त्यामुळे मिळणारे आनुषं[गिक] फायदे संपुष्टात येणार हे त्यांच्या लक्षात आले. कष्टकरी संघटने[चे] कामात वेगाने वाढ होत आहे याची जाणीव या कार्यकर्त्यां[ना] ताबडतोब झाली. त्यानंतर विधान सभेच्या निवडणुकांत मा[र्क्स]वादी कम्युनिस्ट पक्षाने कष्टकरी संघटनेचे साहाय्य माग[ितले]. या निवडणुकीत मा. क. पक्षाचे लहानू कोम निवडून आले. त्या[वेळी] प्रथम मा. क. पक्षाच्या कार्यकर्त्यांना आणि विशेषतः गोदावरीबा[ईंना] कष्टकरी संघटनेच्या लोकांवरील प्रभावाची तीव्र जाणीव झा[ली]. ही संघटना वाढत राहिल्यास आपल्या ह्या भागातल्या प्रभुत्वा[ला] शह बसेल ही गोष्ट त्यांनी ओळखली आणि त्यानंतर कष्टकरी [संघ]टनेच्या कार्यकर्त्यांवर प्रत्यक्ष हल्ले करण्यास सुरवात केली.

१५ ऑगस्ट १९८० रोजी संघटनेची एक मीटिंग सायवान येथे [हो]णार होती. या मीटिंगपूर्वी निकी कार्डोझा व सुशीला डिसोझा [यांना] मारहाण करण्यात आली. त्यानंतर अनेक कार्यकर्त्यांवर हल्ले झाले.

१८ ऑक्टो. १९८० रोजी गांगणगाव व शिसणे या संघटनेचे कार्य असलेल्या गावांवर सामुदायिक हल्ले चढवण्यात आले. हा संघर्ष अद्यापही मिटला नाही. नुकतेच म्हणजे ५ जून १९८१ रोजी संघटनेचे कार्यकर्ते निकी कार्डोझो यांच्यावर कासागावात ते बसमधून जात असताना हल्ला करण्यात आला.

## गोदावरीबाईंची चिखलफेक

निवडणुकीनंतर, गोदावरीबाई आणि किसान सभेचे इतर कार्यकर्ते यांनी संघटनेविरुद्ध जोरदार जाहीर प्रचार सुरू केला. इकॉनॉमिक आणि पोलिटिकल विकलीच्या ४ ऑक्टो. १९८० च्या अंकात गोदावरीबाईंची एक मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. यात गोदावरीबाईंनी कष्टकरी संघटनेला परदेशातून बराच पैसा मिळतो, असा एक आरोप केला आहे. त्याचा पुरावा म्हणून संघटनेच्या एका कार्यकर्त्याने ' एका बाईवर अत्याचार झाल्याचे प्रकरणी चौकशी करण्यासाठी वृत्तपत्राच्या वार्ताहरांना घेऊन येण्यासाठी जीपची व्यवस्था करता येईल का ? ' असे विचारल्याचा उल्लेख केला आहे. जीपची व्यवस्था पैशाशिवाय करता येणार नाही आणि हे पैसे चर्चकडून आणि परदेशातून मिळत असावे असे ध्वनित केले आहे. कष्टकरी संघटनेचे कार्यकर्ते अतिशय साधे राहतात. त्यांच्याकडे कोणतेही वाहन नाही. असे असले तरी, मुंबईतील सहानुभूतीदारांकडून जीपची व्यवस्था होणे कठीण नाही. त्याचप्रमाणे या उल्लेखलेल्या पत्रात जीपची व्यवस्था होऊ शकेल का? असे विचारलेले आहे व्यवस्था केली आहे असे म्हटले नाही. हेही लक्षात ठेवले पाहिजे. दुसरा आरोप कष्टकरी संघटना ही ख्रिश्चन मिशनरी संघटना आहे असा आहे. एकदा त्यांच्याकडे कष्टकरी संघटनेचे दोन फादर आले आणि त्यांनी आपली मातृभाषा इंग्लिश असल्याचे सांगितले, असे गोदावरीबाईंनी नमूद केले आहे. त्यांनी आपली नावेही सांगितली नाहीत असे त्या म्हणतात. हे दोघे आपली नावे निकीभाऊ प्रदीप प्रभू अशी लावतात. परंतु प्रत्यक्षात त्यांची नावे निकी कार्डोझो व पीटर डिमेलो आहेत, असे या मुलाखतीत म्हटले आहे. यातील खोटेपणा स्पष्ट आहे. इंग्रजी मातृभाषा सांगणाऱ्या आणि नावही न सांगणाऱ्या तरुणांना गोदावरीबाईंनी ताबडतोब हुसकून द्यावयास पाहिजे होते तसे त्यांनी केल्याचे दिसत नाही. हे लोक मुंबईत व पुण्यात नेहमी चर्चमध्ये राहतात असेही त्यांनी म्हटले आहे. ही माहिती गोदावरीबाईंना कोठून मिळाली हे कळत नाही. प्रदीप प्रभू यांचे आईवडील मुंबईतच असतात आणि निकी कार्डोझो मुंबईतच वाढले असून, त्यांचे भाऊही मुंबईतच राहतात हे गोदावरीबाईंना माहीत नसावे. मी स्वतः प्रदीप प्रभू यांना त्यांच्या मुंबईतील घरी भेटलो आहे.

कष्टकरी संघटनेचे लोक सरकारी कर्मचाऱ्यांविरुद्ध गैरप्रकार करतात असे गोदावरीबाईंना म्हटले आहे. सरकारी नोकरांविषयी त्यांची स्वतःची काहीही तक्रार दिसत नाही. गोदावरीबाईंचे हे म्हणणे किसान सभेच्या या भागातील कार्यकर्त्यांच्या वागण्याशी सुसंगत असले तरी वस्तुस्थितीला सोडून आहे. या लोकांना या भागात नागालँड निर्माण करायचे आहे, असा आरोप गोदावरीबाईंनी केला आहे. या आरोपात तथ्य नाही. हा काही आदिवासींचे स्वतंत्र राज्य होण्यासारखा भाग नाही.

गोदावरीबाईंनी कष्टकरी संघटनावाले परदेशी हस्तक असल्याची टीकाची भूमिका घेऊ नये आणि सुशीला डिसोझा यांच्यावर चारित्र्यविषयक टीका करण्यापेक्षा राजकीय टीका करावी, त्याचप्रमाणे वर्तमानपत्रीय व दहशतींच्या वातावरणापेक्षा काही तरी भरीव करावे अशा सूचना सुमारे वर्षभर भूमिसेनेचे काम करणाऱ्या आणि मा. क. पक्षाचे समर्थक असणाऱ्या रमण देशपांडेंनी केल्या आहेत, ( माणूस २० सप्टेंबर १९८० ) एकेकाळी भूमिसेनेत काम करणारे व सध्या किसान सभेचे काम करणारे आदिवासी ख्रिश्चन एडवर्ड वर्ठा यांच्यामते कम्युनिस्ट पक्ष व कष्टकरी संघटना यांमधील संघर्ष दोघांच्या राजकीय, वैचारिक आणि कार्यपद्धतीतील भेदातून निर्माण झाला आहे. वारली लढ्यानंतर पक्षाने चांगले केडर तयार केले नाही आणि पक्षाची लोकांवरील पकड ढिली झाली, असे त्यांनी म्हटले आहे. सीपीएमसारख्या प्रबळ व अनुभवी डाव्या राजकीय शक्तीने आपल्यातील कमजोरी दूर करण्याचा सातत्याने प्रयत्न करावा. इतर डाव्यांच्या टीकेकडे तिरस्काराने न पाहता ती समजावून घ्यावी. भलते दोषारोप न करता विरोध चर्चेने व तडजोडीने मिटवावेत असेही ते म्हणतात. ( तात्पर्य, जानेवारी १९८१ )

दुर्दैवाने, मा. क. पक्षाने तडजोडवादी भूमिका स्वीकारलेली नाही. दहशतवादाचा अवलंब करून कष्टकरी संघटनेचे काम बंद पाडायचे असा त्यांचा स्पष्ट प्रयत्न आहे.

## पुढे काय ?

कष्टकरी संघटनेचे काम सुमारे पन्नास गावात पसरलेले आहे. या संघटनेकडे तरुण कार्यकर्त्यांचा मोठा संच आहे. लोकांच्या शोषणाविरुद्ध त्यांनी प्रत्यक्ष कार्य चालवलेले आहे त्या मानाने किसान सभेचे कार्यकर्ते बरेच ढेपाळलेले आहेत. कित्येकांचे शोषण करणाऱ्यांबरोबर संधान जुळलेले आहे. लाल बावट्याचे नाव घेऊन ग्रामपंचायती ताब्यात घेऊनही आदिवासींचे छोटे–छोटे प्रश्नही सुटलेले नाहीत. यातील कित्येक कार्यकर्त्यांच्या वर्तनाविरुद्ध गेली काही वर्षे असंतोष धुमसत होता. आज या असंतोषाने तीव्र स्वरूप धारण केले असून तो उघड होत आहे. अशा परिस्थितीत मारझोड करून, दडपशाहीने, कष्टकरी संघटनेचे या भागातून उच्चाटन होणे अशक्य आहे, याउलट अशा प्रयत्नांनी, भारतात अनेक भागांत जनजागरण आणि जनसंघटन करणारे गट मा. क. पक्षाकडे संशयाने बघण्याचा संभव आहे. या संघर्षाचा जास्तीतजास्त फायदा भ्रष्ट अधिकारी आणि सावकार–दुकानदार यांना होणार आहे. कष्टकऱ्यांच्या मदतीने मा. क. पक्षाने विधानसभा निवडणूक जिंकली होती की स्वतंत्र बळावर जिंकली होती, हे पुढच्या निवडणुकीतच स्पष्ट होईल या संघर्षातून मा. क. पक्षाला बरेच शिकावे लागेल जनजागरणाचे व जनसंघटनाचे काम करणाऱ्या कष्टकरी संघटनेसारख्या इतर गटांनाही या संघर्षापासून बरेच शिकण्यासारखे आहे. कष्टकरी संघटनेने एकाच वेळी दुकानदार, व्यापारी, सावकार, सरकारी अधिकारी आणि पंच-सरपंचादी पदाधिकाऱ्यांविरुद्ध लढे दिले. त्यामुळे त्यांना एकदमच अनेक शत्रू निर्माण झाले. लढ्यांची योग्य आखणी करून हे टाळता आले असते. आपले काम सुरू करण्यापूर्वी संघटनेने या भागात आपले मित्र कोण आहेत याची पाहाणी केली नाही. जिल्हा पातळीवरील किंवा त्यावरील पातळीवर सरकारी अधिकाऱ्यांकडे केल्या गेलेल्या तक्रारींविषयी त्यांच्याकडे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला नाही. जनशक्तीच्या जोरावरच सर्व प्रश्न सोडवले पाहिजेत ही भूमिका फक्त सैद्धांतिक दृष्ट्याच बरोबर आहे. प्रत्यक्षात काही प्रश्न सोडवताना कायद्याची, सहानुभूतिदार सरकारी अधिकाऱ्यांची आणि इतर मित्रांची मदत घ्यावी लागते, हीही गोष्ट कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. ◎